# <u>काय केंद्र सरकार राज्य सरकारच्या निर्णयाचा तपास करु शकते?</u>

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

प्रजासत्ताक भारताची घटना ही मूळ रचनेचा भाग आहे. संघीय सिद्धांत अफेरफारपात्र आहे. केंद्र आणि राज्याचा अधिकारक्षेत्र स्पष्ट रित्या सीमांकित आहे. कोणत्याही मुद्द्यावर त्यात फेरफाराची गरज नाही.

प्रजासत्ताकावर जोखिम असल्याचे जेव्हा दिसते, तेव्हा आपण सामान्य रित्या केंद्र सरकार द्वारे त्या संघीय सिद्धातांवर अतिक्रमण झाल्याची शंका येते. केंद्र सरकार त्याच्या एजन्सीमार्फत सामान्य रित्या राज्यात जे काही राज्यात घडते त्याचा सहसा तपास करित नाही. मात्र असाधारण किश्श्यात ते सल्ला देऊ शकतात. घटनेच्या तंत्राचे उल्लंघन होताना दिसत असेल तर कलम-356 खाली सत्तेचा उपयोग केला जाऊ शकतो. राज्याच्या सरकारी अंमलदाराविरुद्ध तपासासाठी राज्य खास संमती देतो किंवा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिला तरच तपास करण्यापर्यंत सीबीआयची सत्ता मर्यादित आहे.

दिल्ली तपास प्रकरणी मी ही टिप्पणी करत आहे. माझी टिप्पणी ही नैसर्गिक गॅसचे भाव नक्की करण्याच्या संदर्भात नाही आहे. नाराज खासदारांनी संसदेत हा मुद्दा उठवला आहे. न्यायालयाच्या प्रक्रियेद्वारे थेट तपास होऊ शकतो. हा मुद्दा राज्य सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेद्वारे तपासास पात्र आहे, म्हणून, काय केंद्र सरकार राज्यांकडून घेण्यात आलेल्या निर्णयाचा तपास करु शकते?

दिल्ली राज्य विधानसभा हे केंद्रशासित प्रदेश आहे. दिल्लीचे कायदाकीय आणि प्रशासकीय अधिकारक्षेत्र कलम 239 एए खाली येते. त्याचे कलम 1,2 आणि सातमध्ये सुधाराखालील राज्यांची यादी 18 दिल्लीला लागू पडत नाही. दिल्लीत जाहीर हुकूम नियमन आणि पोलिस प्रकरणी दिल्ली विधानसभेची सत्ता आहे. केंद्र सरकारकडे कारभाराची सत्ता आहे, कायद्याची सत्ता नाही. दिल्ली सरकारकडेच पोलिसांबाबतीतली सत्ता आहे. काय दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेच्या कामगिरीत केंद्र तपास करु शकते? भ्रष्टाचार विरोधी शाखा दिल्ली सरकारच्या विजीलन्स कचेरीचा भाग आहे. या संदर्भात दिल्ली सरकारकडे सर्व सत्ता आहे. दिल्लीच्या भौगोलिक विस्तारात पोलिस अमर्यादित सत्ता आहे. दिल्ली सरकारच्या भ्रष्टाचार विरोधी शाखेसाठी राज्य यादीत एन्ट्री 2 दिल्लीला लागू करण्यात आली आहे. घटनेचे कलम 239एए द्वारे ती सत्ता प्रतिबंधित करण्यात आली आहे. राष्ट्रीय राजधानीत केंद्र सरकारची कामगीरी एक समांतर अधिकारक्षेत्र सूचित करते. दिल्लीत केंद्र सरकारची कार्यपद्धती तिच्या अधिकारक्षेत्राखाली आणि दिल्ली सरकारची कार्यपद्धती अधिकारक्षेत्राखाली आहे. पंतप्रधानांचे कॅबिनेट सचीव सर्व सरकारी अंमलदारांसाठी राज्य सरकारच्या अधिकारक्षेत्रात दखल देऊ शकते का ती एक संवेदनशील बाब आहे. याबाबत पोलिसांच्या सत्तेचे अस्तित्व शंकास्पद आहे. राज्यसरकारच्या पोलिस अधिकारक्षेत्राखाली केंद्र सरकार घटनेची दखल घेऊ शकत नाही. ते संघीय सिद्धांताचे उल्लंघन आहे. घटनेचे पालन करताना संयम आणि मुत्सद्देगिरीची गरज आहे. घटनेतील संस्थांनी साहसिक कृत्याद्वारे त्याला सुरक्षित करु शकतात. अन्यथा मी गंभीरपणे न्यायालयाचा अभिप्राय घेण्याच्या बाजूने आहे.

संयुक्त सचिव स्तर किंवा त्याच्यापेक्षा वरील अधिका-यांसाठी ‘एक मुद्द्याची सूचना’ म्हणून तपासाच्या सत्तेसाठी केंद्र सरकारच्या संमतीची गरज आहे. सर्वोच्च न्यायालय त्याला कोणतेही कायद्याचे पाठबळ दिलेले नाही. त्या आदेशाचे सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. कारण की ते विवादास्पद रित्या घडविण्यात आले होते. कायदा आणि सुव्यवस्था तसेच कायद्याचे अंमलीकरण राज्याचा विषय आहे. काय एका राज्याचा पोलिस सब ईन्सपेक्टर तपासासाठी पंतप्रधान किंवा कॅबिनेट सचिवाला समन्स देऊ शकतो?अशाप्रकारे सत्तेचा राजकीय कारणास्तव दुरुपयोग होऊ शकतो. त्यासाठी केंद्र सरकारची आधीच परवानगी गरजेची असते. त्याबाबतीतल्या आदेशावर टीका करण्यात आली आहे. केंद्र सरकारचा तपास करण्याचा निर्णय दिल्ली सरकारच्या तपासात दखलअंदाजी करण्यासारखा आहे. सरकारने घटनेच्या परंपरेची काळजी घेतली पाहिजे.